Review Of Research

ISSN: 2249-894X Impact Factor : 3.8014(UIF) Volume - 6 | Issue - 3 | December - 2016


# "कला महाविद्यालय, पाटोदा वाचन अभिरुचि एक चिकित्सा"

ज्योती शामराव मगर

ग्रंथपाल, महिला कला महाविद्यालय, बीड.

**सार :**

संबंधित पेपर हा संशोधनात्मक स्वरुपाचा आहे. यात बीड जिल्हयातील कला महाविद्यालय पाटोदा, येथील वाचकांचा वाचन अभिरुचीच्या संदर्भात प्रकाश टाकला आहे. आजचे युग हे IT (माहिती तंत्रज्ञान) चे युग असल्या कारणामुळे वाचकांचा ग्रंथालयाकडे येण्याचा कल कमी व Copy Paste ची ओढ जास्त प्रमाणात वाढलेली आहे. प्राप्त आणि प्रतिकूल परिस्थितीमध्ये ग्रंथपाल या नात्याने काय प्रयत्न केले पाहिजे हे पाहणे हाच या पेपरचा महत्त्वपूर्ण उद्देश आहे.



## 1) प्रस्तावना :-

प्राचीन भारतात आयोध्या, काशी, कांची, उदंतपुरी, गुणशिला, नालंदा अशी अनेक विद्यापीठे अस्तित्वात होती. या विद्यापीठातून हिंदू, जैन व बौध्द धर्मांचाऱ्यांनी असंख्य हस्तलिकिते जतन केले होते. मध्य युगात अनेक मोगल शासकांनी किताब खाने साकारली होती.

आज ग्रंथालय ही एक सामाजिक संस्था आहे मानवी जीवनाच्या आवश्यकता पैकी एक म्हणून तीची निर्मिती झाली आहे व सामाजिक गरजामधून तिचा विकास झाला आहे. ज्ञान साधना पर्यंत सहजपणे पोहचण्याचे मार्ग गरजूंना देणे हे ग्रंथालयाचे प्रमुख भूमिका आहे. आणि या दृष्टीकोणातून पाहिल्यास ग्रंथालयाची कार्य म्हणजे शिक्षणाप्रमाणे आवश्यक अशी सामाजिक प्रक्रिया असून मी तर्कशुध्द व तत्वशुध्द पायावर आधारलेली असते. सदर संशोधन पेपर वाचकांमधील वाचन अभिरुचीचे कार्य शोधले जाणार आहे. प्राचीन काळी शास्त्रज्ञ, विचारवंत, कलावंत होऊन गेले व पुढेही होतील या सर्वांशी व्यक्तीशः संपर्क साधने कठीण होते. परंतू ग्रंथामूळे आपण सर्वांशी संपर्क किंवा संवाद साधू शकतो. ग्रंथ हे मानवाचे अखंड सोबती आहेत. ग्रंथामूळे मानवाची संस्कृती जतन केल्या जाते. ग्रंथ मानवाच्या अनुभवाची खाण आहे. तिचा कधीही क्षय होत नाही. उलट त्यामध्ये वृध्दी होते. ग्रंथाची थोरवी सांगताना लोकमान्य टिळकांनी ग्रंथ हे आपले गुरु होत असे म्हटले आहे. मानवी जीवन सुखावह आणि सुसहाय्य होण्यास ज्या गोष्टी आवश्यक मानल्या जातात. त्यात ग्रंथ ही एक महत्तवाची गोष्ट आहे.

परमेश्वराचे अस्तित्व ज्याप्रमाणे सर्वव्यापी मानले जाते. तसेच आज ग्रंथ हे कुठेही प्रवेश करु शकतात. वाङ्मयीन आणि शिक्षण संस्थातून तर ग्रंथालयाची उपयुक्तता आणि महत्व आहेच पण मनुष्याचा मानसिक विकास घडवणे, त्याचे मन सुसंस्कृत बनविणे हे कार्य ग्रंथालये उत्तम प्रकारे करु शकतात.

## 2) व्याख्या :-

1) लायब्ररी हा शब्द इंग्रजी शब्द लॅटीन लायबर या शब्दपासून आला आहे. लायबर या शब्दाचा अर्थ पुस्तक असा आहे. ज्या ठिकाणी पुस्तके वाचका करिता निरनिराळ्या विषयाप्रमाणे नीट लावून ठेवलेली असतात त्या स्थानाला पुस्तकालय (ग्रंथालय) असे म्हणतात[2].

2) पिसर्स बटलर च्या मते "ग्रंथ पालनाच्या मुलतत्वामध्ये पुढील गोष्टीचा समावेश होतो. समाजाने एकत्रीत केलेली ज्ञान पुढील पिढिकडे सुपूर्द करणे व अशा प्रक्रियासाठी लिखित नोंदीच्या स्वरुपातील साधनांचा उपयोग करणे"[6].

मानवला जीवंत राहण्यासाठी अन्नची गरज असते तसेच माणसाची बौध्दीक भूक भागविण्यासाठी वाचनाची गरज आहे. बौध्दीक पातळी व ज्ञान वाढविण्यासाठी ग्रंथ ही बहुमोल संपत्ती आहे. मानवी जीवनात ग्रंथाचे अनन्य साधारण महत्तव आहे.

ग्रंथ मनवाच्या कल्पनाची, विचारांची, भावनांची आणि अनुभवांची एक शिदोरी आहे. येणारी प्रत्येक पिढी या शिदोरीचा उपयोग करते ती इतरांना दिल्याने तिचा क्षय होत नाही ही ग्रंथरुपी शिदोरी मानव जातीची अखंड सोबती आहे[1].

## 3) उद्दिष्टये :-

- ग्रंथालयातील वाचकांच्या वाचनाच्या हेतुचा शोध घेणे.
- विद्यार्थ्यांमध्ये वाचन अभिरुची वाढीस लावण्यासाठी ग्रंथालय कसे सहस्यभूत ठरते हे पाहणे.
- चोखंदळ वाचकांसाठी ग्रंथालय विशेष पुस्तके वाचकांना उपलब्ध करुन दिली जातात का ?

- वाचकांच्या प्रक्रिया जाणून घेणे.

**4) वाचनाचा अर्थ व स्वरुप :-**

वाचन म्हणजे लिखित संकेताचा अर्थपूर्ण अवबोध यात शब्दांची प्रत्यभिज्ञा, प्रवाह, आकलन इ. बाबीचा समावेश होतो. तर वाचन कौशल्यात शब्द ज्ञान, आकलन, अर्थग्रहन व अलिखित वाचन यांचा समावेश होतो.

"वाचन म्हणजे छापलेल्या चेतकामुळे होणारी विचार प्रक्रिया"

"Reading is thinking undoes the stimulus of print"

"वाचन म्हणजे एखाद्या शब्दाने या शब्द समुहाने व्यक्त होणाऱ्या कल्पनेचे ज्ञान घेणे होय".

**5) वाचनाचे महत्त्व :-**

वाचनावर प्रभूत्व मिळविणे म्हणजे ज्ञान भांडरांची किल्लीच हाती येणे होय.

- वाचनामुळे माणूस विचारी बनतो.
- मन सुसंस्कृत होते.
- अंगी बहुश्रुतपणा येतो.
- सारासार विचार करण्याची क्षमता प्राप्त होते.
- वाचनामुळे संकटाला, दुःखद प्रसंगाना तोंड देण्याचे धैर्य प्राप्त होते.
- वाचन हा एक विरंगुळा आहे, या विरंगुळा मुळे उदासिनता नाहीसी होते.
- वाचनामुळे महान स्त्री-पुरुषांच्या कतृत्वाबद्दल त्याच्या मनात आदराची भावना निर्माण होते.
- ज्या समाजात वाचनारे युवक असतात तो समाज सुसंस्कृत, समजूतदार बनतो.
- चांगल्या वाचनाच्या सवयी माणसाला शुद्र जाणिवांच्या पालीकडे घेवून जातात.

ज्याला एकदा चांगल्या वाचनाचा नाद लागला त्याच्या करमणुकला सीमा नाही. त्याला आपला काळ सोडून भुतकाळ किंवा भविषय काळात प्रवेश करायचा असेल ज्याला पृथ्वीवरील आजपर्यंत कोणत्याही देशांत झालेले मोठे-मोठे तत्ववेत्ते, कवी, नाटककार, यांचा परिचय करन ज्ञानमृताचे सेवन करावयाचे असेल त्याला वाचाना खेरीज दुसरा पर्याय नाही.

**6) वाचनाचे फायदे :-**

- मुद्रीत साधनाच्या माध्यमातून ज्ञान प्राप्ती होवू शकते.
- रिकामा वेळ घालविण्याचे साधन वाचन हे सर्वांत उत्तम व स्वस्त साधन आहे.
- वाचनामुळे अनेक विषयाचे ज्ञान मिळते व्यक्ती बहुश्रुत होते.
- विचार शक्तीला चालना मिळते.
- वाचनामुळे व्यक्ती स्पष्ट व प्रसंगानुरुप व प्रभावपूर्ण लेखन करु शकतो.
- वाचनामुळे आत्मविश्वास प्राप्त होतो.
- व्यक्तीमहत्वाचा विकास होतो.
- वाचनाचे अंतिम स्वरुप म्हणजे कलात्मक रितीने प्रगट, पठण करणे होय.
- वाचनामुळे व्यक्तीच्या विशिष्ट भावणिक अंगाचा संस्कृतिक अंगाशी परिचय होतो.
- वाचनामुळे वाङ्मयीन अभिरुचीचा व रसगृहण सक्षमतेचा विकास होतो.

### सारणी क्र. 1

**अ)** वाचकांची वाचनाभिरुची वाढण्यासाठी ग्रंथालय कोणते प्रयत्न करते ?

| अ.क्र. | विवरण | होय | नाही |
|---|---|---|---|
| 1 | ग्रंथालयाची परिचय पुस्तिका प्रकाशित करता का ? | - | नाही |
| 2 | काच फलक / सुचना फलकात नविन माहिती ग्रंथ सूची लावता का ? | होय | - |
| 3 | भित्तीपत्रक लिखान करण्यास वाचकांस प्रवृत्त केले जाते का ? | होय | - |
| 4 | वादविवाद स्पर्धा, भाषण, कथा कथन, कविता वाचन इ. स्पर्धा ग्रंथालयामार्फत घेतल्या जातात का ? | होय | - |
| 5 | आदर्श विद्यार्थी पुरस्कार दिला जातो का ?<br>(डॉ. एस.आर. रंगनाथन यांच्या नावे) | - | नाही |

वरील सारणी क्र. 1 चे अवलोकन केले असता असे निर्दशनास येते की, वाचकांना वरील पाच प्रश्न विचारले होते तेंव्हा प्रतिसाद हा तीन प्रश्नाचे उत्तरे होय असे मिळाले आहेत. म्हणजे वाचन अभिरुची वाढविण्यासाठी संबंधित ग्रंथालयाकडून 60% प्रयत्न केला जातो असे स्पष्ट होते.

### विद्यार्थी निहाय सारणी क्र. 2

**ब)** जयभवानी शिक्षण संस्थेचे कला महाविद्यालय, पाटोदा हे महाविद्यालय प्रस्तूत संशोधन पेपरसाठी, माहिती संकलीत करण्यासाठी काही विद्यार्थी प्रतिनिधी म्हणून नमुना निवड पध्दतीप्रमाणे निवडले आहे.

| अ.क्र. | वर्ग | भाग | प्रवेश घेतलेले विद्यार्थी | प्रश्नावली भरुन घेण्यासाठी निवडलेले विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| 1 | बी.ए. | प्रथम वर्ष | 259 | 26 (10 %) |
| 2 | बी.ए. | द्वितीय वर्ष | 123 | 12 (10 %) |
| 3 | बी.ए. | तृतिय वर्ष | 120 | 12 (10 %) |
| | | **एकूण** | **502** | **50 (10 %)** |

संबंधित महाविद्यालयात बी.ए. प्रथम वर्ष, द्वितीय वर्ष, आणि तृतिय वर्ष असे पदवीचे तीन वर्ग आहेत. बी.ए. प्रथम वर्ष 259, द्वितीय वर्ष 123, व बी.ए. तृतिय वर्ष 120, विद्यार्थी आहेत नमुना निवडी मध्ये 10% या प्रमाणे बी.ए. प्रर्थम वर्ष, द्वितीय वर्ष, तृतीत वर्ष अनुक्रमे 25,12,12 असे विद्यार्थी प्रश्नावलीसाठी निवडलेले आहेत.

### सारणी क्र. 3

**क)** वाचकांचा ग्रंथालयात जाण्याचा उद्देश काय ?

| अ.क्र. | विवरण | वाचकांची संख्या | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1 | ग्रंथ घेण्यासाठी (Text Book) | 50 | 62.50% |
| 2 | वृत्तपत्रे वाचण्यासाठी | 15 | 18.25% |
| 3 | संदर्भग्रंथ पाहण्यासाठी | 10 | 12.50% |
| 4 | नियतकालिके वाचण्यासाठी | 03 | 3.75% |
| 5 | ललित साहित्य वाचण्यासाठी | 15 | 18.75% |
| 6 | रिकामा वेळ घालवण्यासाठी | 02 | 2.50% |
| | **एकूण** | **80** | **100.00%** |

वरील सारणीचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते ही ग्रंथालयात सर्वात जास्त विद्यार्थी हे Text Book घेण्यासाठी जातात व सर्वांत कमी विद्यार्थी हे नियतालिकांचे वाचन करण्यासाठी जातात असे स्पष्ट होते.

**सारणी क्र. 4**

**ड)** ग्रंथालयात दिल्या जाणाऱ्या सेवा सुविधा संदर्भात वाचकांचा प्रतिक्रीया जाणून घेतल्या असता खालील प्रकारे काही प्रश्नाचे उत्तरे प्राप्त झाली आहेत.

| अ. क्र. | सेवा /सुविधा | होय | वाचकांची संख्या | नाही | वाचकांची संख्या | होय टक्केवारी | नाही टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | बुक बँक सुविधा दिली जाते का? | होय | 70 | नाही | ------ | 87.50% | ------ |
| 2 | स्वतंत्र अभ्यासिकेची सुविधा आहे का? | होय | 49 | नाही | 20 | 61.25% | 25 |
| 3 | पुरेश वाचन साहित्य आहे का? | होय | 56 | नाही | 10 | 70% | 20% |
| 4 | ग्रंथालयातून मागील वर्षाच्या प्रश्नपत्रिका संच दिला जातो का? | होय | 40 | नाही | 25 | 50% | 31.25% |
| 5 | रात्रीचे ग्रंथालय चालू आहे का? | होय | 05 | नाही | 55 | 6.25% | 68.75% |
| 6 | स्पर्धा परिक्षेसाठी मासिके मिळतात का ? | होय | 55 | नाही | 25 | 68.75% | 18.75% |
| 7 | आंतर ग्रंथालयीन सुविधा मिळते का ? | होय | 48 | नाही | 22 | 60% | 27.50% |
| 8 | ग्रंथालय कर्मचाऱ्याबाबत आपण समाधानी आहात का ? | होय | 65 | नाही | 10 | 80.25% | 12.50% |
| 9 | विविध विषयावर लेखन केले आहे का ? | होय | 20 | नाही | 55 | 25% | 86.75% |
| 10 | संदर्भ सेवा मिळते का ? | होय | 60 | नाही | 10 | 75% | 12.50% |
| 11 | संदर्भ विभागा बाबत आपण समाधानी आहात का ? | होय | 56 | नाही | 12 | 70% | 15% |
| 12 | ग्रंथ सेवा विषयी समाधानी आहात का ? | होय | 18 | नाही | 45 | 22% | 56.25% |
| 13 | ग्रंथालयात स्वतंत्र देवघेव विभाग आहे का ? | होय | 56 | नाही | 12 | 70% | 15% |
| 14 | ग्रंथाचे नुतनीकरण केले जाते का? | होय | 60 | नाही | 10 | 75% | 12.50% |
| 15 | ग्रंथ वेळेवर जमा न केल्यास दंड आकारला जातो का ? | होय | 65 | नाही | 07 | 81.25% | 8.25% |
| 16 | ग्रंथ खरेदीच्या वेळी वाचकांच्या शिफारशीचा विचार केला जातो का ? | होय | 20 | नाही | 50 | 25% | 62.50% |
| 17 | ग्रंथालयामार्फत ग्रंथ प्रदर्शन भरवले जाते का ? | होय | 05 | नाही | 60 | 6.25% | 75% |
| 18 | ग्रंथालयीन वेळी विषयक आपण समाधानी आहात का ? | होय | 54 | नाही | 22 | 67.50% | 22.50% |

वरील सारणीचे अवलोकन केले असता असे निर्देशनास येते की, बुक बँक सुविधा 87.50% वाचकांना मिळते हे स्पष्ट होते तर ग्रंथालय रात्रीची सेवा दिल्या जात नाही. तसेच संबंधि महाविद्यालय ग्रंथालयात ग्रंथ प्रदर्शन भरविले जात नाही हे स्पष्ट होते.

## 7) निष्कर्ष :-

1) या ग्रंथ संग्रहामधून वाचकांच्या गरजा 70% पूर्ण होतात.
2) या महाविद्यालयाच्या ग्रंथालयात 56 % वाचक नियमित ग्रंथालयास भेट देतात.
3) कला शाखेतील 62.50 % वाचकांची आवड क्रमिक ग्रंथ (Text Book) साहित्य प्रकारात असल्याचे आढळून आले.
4) वाचकांना जास्तीत-जास्त ग्रंथ वाचावयास देवून वाचकांची वाचनाभिरुची वाढवण्याचा प्रयत्न ग्रंथालयातून केला जातो.
5) ग्रंथ खरेदी करतानी वाचकांच्या मागणीचा (शिफारशीचा) विचार केला जातो.

## संदर्भ :-

1) कुलकर्णी, व.वि; ग्रंथालयीन व्यवसायाची रुपरेखा, मुंबई : पॉप्युलर प्रकाशन, 1970 पृ 01.2.

2) गुप्ता, सुनिल, चिलड्न्स नॉलेज बँक, नवी दिल्ली, 2001 पृ.प. 4
3) जगताप, ह.ना; शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, पुणे नुतन प्रकाशन, 1991 पृ.31.32
4) नागतोडे, किरण ; शालेय व्यवस्थापन शैक्षणिक सरंचना आणि आधुनिक विचार प्रवाह, नागपूर विद्या प्रकाशन, 1997 प्र. 122
5) पाटणकर, ना.वि. पाटील, लिला ; मराठीचे अध्यापन, पुणे व्हीनस प्रकाशन, 1970 पृ. 37.
6) Bulter Pierce, Introduction to library science, chicage university press, 1933, P.No. 29.
7) www.Beed.org.